14 FEB 2019

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दीक्षांत समारंभाचे भीमराया मेत्री प्रमुख पाहुणे

## शिवाजी विद्यापीठात २२ फेब्रुवारीस सोहळा : कुलपती विद्यासागर राव यांची उपस्थिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा दीक्षांत समारंभ शुक्रवार २२ फेब्रुवारी रोजी होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून तिरूचिरापल्ली येथील भारतीय प्रबंध संस्थानचे (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, आयआयएम) संचालक भीमराया मेत्री उपस्थित राहणार आहेत. तर कुलपती महामहीम राज्यपाल सी. विद्यासागर राव अध्यक्षस्थानी असणार आहेत. या समारंभात विद्यापीठ कॅम्पसवरील जवळपास ३ हजार विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे दिली जाणार आहेत, अशी माहिती विद्यापीठाच्या अधिकृत सूत्रांनी दिली.

अवघ्या आठ दिवसांवर येऊन ठेपलेल्या दीक्षांत समारंभाची तयारी अंतिम टप्प्यात आली असून पदवी प्रमाणपत्र छपाईचे कामकाज युद्धपातळीवर सुरू आहे. यंदा



विद्यासागर राव    भिमराया मेत्री

महाविद्यालयांना जिल्हा निहाय पदवी प्रमाणपत्रांची वितरण व्यवस्था केली आहे. दीक्षांत सोहळा झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत महाविद्यालयांना 'पदवी वितरण समारंभ' (ग्रॅज्युएट डे) साजरा करण्याच्या सुचना दिल्या आहेत. सोमवारी (दि. १८) व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली तर महाविद्यालयांना पदवी वितरण कार्यक्रमासाठी विद्यापीठ अनुदान दिले जाणार आहे. शिक्षण घेतलेल्या महाविद्यालयातच पदवी प्रमाणपत्र स्विकारण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे. गुरुवार २१ रोजी ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. तर दरवर्षीप्रमाणे दीक्षांत समारंभादिवशी सकाळी ८ वाजता ग्रंथ दिंडीचे आयोजन केले आहे.

### ४५ हजार विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे

यंदा प्रत्यक्ष २४ हजार विद्यार्थ्यांना व पोस्टाने २५ हजार विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत. पीएच. डी. पदवी पैकी फॅकल्टी ऑफ आर्ट ॲन्ड फायनल आर्ट, सोशल सायन्स, विज्ञान विभाग, कॉमर्स विभाग, शिक्षणशास्त्र विभाग, अभियांत्रिकी आदी विभागातील जवळपास ५५ स्नातकांना पदवी प्रमाणपत्र व्यासपीठावर प्रदान केली जाणार आहेत.



- दीक्षांत समारंभानंतर ३० दिवसांच्या आत होणार पदवी वितरण समारंभ
- महाविद्यालयांना अनुदान देण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेनंतरच

### मेत्री मूळचे सांगली जिल्ह्यातील अंकलगी गावचे

शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणारे तिरूचिरापल्ली येथील भारतीय प्रबंध संस्थानचे संचालक भीमराया मेत्री हे मूळचे सांगली जिल्ह्यातील अंकलगी गावचे असल्याचे समजते.

लोकमत

# दीक्षांत समारंभाचे प्रमुख पाहुणे बदलले

## शिवाजी विद्यापीठाची तयारी सुरु : भीमराया मेत्री यांना निमंत्रण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा दीक्षांत समारंभ दि. २२ फेब्रुवारीला दुपारी दोन वाजता विद्यापीठाच्या प्रांगणामध्ये होणार आहे. या समारंभाचे प्रमुख पाहुणे बदलले असून, आता तिरुचिरापल्ली (तमिळनाडू) येथील भारतीय प्रबंध संस्थेचे (आयआयएम) संचालक डॉ. भीमराया मेत्री येणार आहेत. आठ दिवसांवर येऊन ठेपलेल्या या समारंभाची विद्यापीठाकडून वेगाने तयारी सुरु आहे.



या समारंभासाठी विद्यापीठाने बंगलोरच्या नॅशनल असेसमेंट अँड अ‍ॅक्रिडिटेशन कौन्सिलचे संचालक डॉ. एस. सी. शर्मा यांना प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्याबाबत निमंत्रित केले होते. त्याबाबत त्यांनी येण्याची तयारी दर्शविली होती. मात्र, काही वैयक्तिक कारणामुळे त्यांनी या समारंभासाठी उपस्थित राहू शकणार नसल्याचे विद्यापीठाला कळविले आहे. त्यामुळे विद्यापीठाने 'आयआयएम तिरुचिरापल्ली'चे संचालक भीमराया मेत्री यांना निमंत्रित केले असून, त्यांनी येण्याचे मान्य केले आहे.

संचालक मेत्री यांचे मूळ गाव अंकलगी (ता. जत, जि. सांगली) आहे. त्यांनी कऱ्हाड येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून स्थापत्यशास्त्र विषयाची पदवी घेतली आहे. शिवाजी विद्यापीठाचे ते माजी विद्यार्थी आहेत. 'आयआयएम तिरुचिरापल्ली'मध्ये रुजू होण्यापूर्वी संचालक मेत्री यांनी बिटस् पिलानी मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट, एल अ‍ॅण्ड टी इन्स्टिट्यूट ऑफ प्रोजेक्ट मॅनेजमेंट, एमडीआय गुडगाव, नवी दिल्लीतील इंटरनॅशनल मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट, आदी संस्थांमध्ये अधिष्ठाता, संचालक पदांवर काम केले आहे. दीक्षांत समारंभाची तयारी अंतिम टप्प्यात आली असून, विविध कामे वेगाने सुरु आहेत.

### अधिविभागातील विद्यार्थ्यांनाच समारंभात पदवी

**यावर्षी सुमारे ४९ हजार स्नातकांना पदवी प्रदान केली जाणार आहे. नवीन विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ झाल्यानंतर ३० दिवसांमध्ये महाविद्यालयातील पदवीधरांना त्यांची पदवी अथवा पदविका अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र महाविद्यालयातच वितरित करण्याचा नियम आहे. या नियमानुसार विद्यापीठाच्या यंदाच्या ५५ व्या दीक्षांत समारंभापासून कार्यवाही करण्यात येणार आहे. समारंभादिवशी विद्यापीठातील अधिविभागातील विद्यार्थी, पीएच.डी., एम. फिल. अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या सुमारे १७०० स्नातकांना पदवी प्रदान केली जाणार आहे. उर्वरित स्नातकांना महाविद्यालयात पदवी प्रदान केली जाणार आहे. समारंभाची विविध स्वरुपातील तयारी वेगाने सुरु असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी सांगितले.**

14 FEB 2019
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कलेकडे करिअर म्हणून बघितले पाहिजे : डॉ. शिर्के

## कलामंदिरच्या वार्षिक प्रदर्शनास प्रतिसाद

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

कलेकडे करिअर म्हणून बघितले पाहिजे. त्यासाठी नवनवीन ट्रेंड, आकर्षकता, माफक दरात उपलब्ध झाले पाहिजेत. विद्यार्थ्यांनी कलेचे उपासक म्हणून राहावे, असा संदेश शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिला. कलामंदिर महाविद्यालयाच्या वार्षिक चित्र-शिल्प प्रदर्शनाच्या प्रारंभी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी महापौर मारुतराव कातवरे होते.

कुमावत सेवा संघ संचालित कलामंदिर महाविद्यालयाचे वार्षिक चित्र-शिल्प प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. राजर्षी शाहू स्मारक भवन येथे आयोजित या प्रदर्शनात फौंडेशन, पेंटिंग, शिल्पकला विभागातील विद्यार्थ्यांनी वर्षभर केलेल्या कलाकृती मांडल्या आहेत. यामध्ये पेंटिंग विभागातील विविध माध्यमात केलेली निसर्गचित्रे, व्यक्तिचित्रे, रचनाचित्रे, प्रिंट यांचा समावेश आहे. तसेच शिल्पकला विभागात मेटल, दगड, फायबर या माध्यमातील शिल्पे प्रदर्शित केली आहेत. फौंडेशन विभागातील ५० चित्रे, पेंटिंग विभागातील ७० चित्रे आणि शिल्पकला विभागातील ४० शिल्पांचा समावेश आहे. या प्रदर्शनात पतंग विविध आकर्षक रंगात रंगवून त्यांची मांडणी केली आहे. उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य जी. एस. माजगावकर यांनी केले. पाहुण्यांची ओळख संभाजी माजगावकर यांनी करून दिली. यावेळी विद्यार्थी प्रतिनिधी सुधीर उमाप, अभिजित मस्कर, भक्ती देशमुख उपस्थित होते. चित्रकार मोहन वडणगेकर, डॉ. डी. डी. कुंभार, सर्जेराव निगवेकर, किशोर पुरेकर, राजेंद्र वागवेकर, प्रा. डॉ. प्रकाश कुंभार, अशोक आरेकर, सतीश बाचणकर आदी मान्यवर उपस्थित होते.

आभार प्रा. रोहित बावडेकर यांनी मानले, सूत्रसंचालन प्रा. योगेश मोरे यांनी केले. प्रदर्शनाचे संयोजन कलामंदिर शिक्षक प्रा. विजय कुंभार, प्रा. विनायक गायकवाड, प्रा. निशा पोवार आणि विद्यार्थ्यांनी केले. हे प्रदर्शन दि. १४ फेब्रुवारीपर्यंत सर्वांसाठी खुले राहणार आहे. यानिमित्ताने चित्रकार, शिल्पकार यांची प्रात्यक्षिकेही आयोजित केली आहेत.



शाहू स्मारक भवन येथे कलामंदिर महाविद्यालयाच्या चित्र-शिल्प प्रदर्शनास रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. (छाया : एस. अली)

जनसंपर्क कक्ष
14 FEB 2019 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# विद्यापीठाच्या स्वनिधीतून आठ प्राध्यापकांना पदोन्नती

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील आठ प्राध्यापकांना विद्यापीठ स्वनिधीतून कॅस अंतर्गत पदोन्नती देण्यात आली आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते पदोन्नतीची पत्रे प्रदान करण्यात आली.

विद्यापीठातील पदोन्नतीमध्ये कॉम्प्युटर सायन्स अधिविभागाचे डॉ. व्ही. एम. कुंभार व डॉ. के. एस. ओझा यांची २३ नोव्हेंबर २०१४ ला सहाय्यक प्राध्यापक दुसऱ्या स्टेजवर पदोन्नती दिली आहे. कॉम्प्युटर सायन्स अधिविभागाचे डॉ. यु. आर. पोळ यांना ३१ डिसेंबर २०१४ पासून सहाय्यक प्राध्यापक दुसऱ्या स्टेजवर पदोन्नती दिली आहे. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या डॉ. ए. व्ही. निगवेकर यांना २५ मार्च २०१४ पासून सहाय्यक प्राध्यापक दुसऱ्या स्टेजवर पदोन्नती दिली आहे. विधी अधिविभागाचे धुपदाळे यांना ५ मार्च २०१५ पासून सहाय्यक



प्राध्यापक दुसऱ्या स्टेजवर पदोन्नती दिली आहे. फुड सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजीचे डॉ. आर. सी. रणवीर यांना २८ मार्च २०१५ पासून सहाय्यक प्राध्यापक दुसऱ्या स्टेजवर पदोन्नती दिली आहे. तंत्रज्ञान अधिविभागाचे डॉ. व्ही. ए. सावंत यांना २४ डिसेंबर २०१५ पासून सहाय्यक प्राध्यापक दुसऱ्या स्टेजवर पदोन्नती दिली आहे. तंत्रज्ञान अधिविभागाचे ए. बी. कोळेकर यांना १४ ऑगस्ट २०१४ पासून सहाय्यक प्राध्यापक तिसऱ्या स्टेजवर पदोन्नती दिली आहे.

**कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते पदोन्नतीची पत्रे प्रदान**

पुढारी

संक्षिप्त

## विद्यापीठातील आठ शिक्षकांना पदोन्नती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील आठ शिक्षकांना बुधवारी सहायक प्राध्यापक म्हणून पदोन्नती देण्यात आली. विद्यापीठ स्वनिधीमधून कॅसअंतर्गत या पदोन्नत्या करण्यात आल्या. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, अधिष्ठाता डॉ.पी.एस.पाटील, डॉ.पी.डी. राऊत, डॉ.ए.एम.गुरव, इनोव्हेशन व इनक्युबेशन सेंटरचे संचालक डॉ.आर.के.कामत, तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. जे.एस.बागी यांच्या उपस्थितीत पदोन्नतीची पत्रे प्रदान करण्यात आली. कॉम्प्युटर सायन्सचे डॉ. व्ही.एस.कुंभार, डॉ. श्रीमती के.एस.ओझा, डॉ. श्रीमती यू.आर.पोळ, संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या डॉ. श्रीमती ए.व्ही. निगवेकर, विधी विभागाचे डॉ. व्ही. वाय.धुपदाळे, फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे डॉ.आर.सी.रणवीर, तंत्रज्ञान विभागाच्या डॉ. श्रीमती व्ही.ए.सावंत व ए.बी.कोळेकर यांचा या पदोन्नतीत समावेश आहे.